**प्रेस नोट** दि.२३.१०.२०२०

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, व पत्ता | १) श्री.शंकरलाल महेशकुमार आहुजा, वय – ३३ वर्ष, व्यवसाय – संचालक, एम.डी.एम. बिल्डर अॅण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. अमरावती.रा.आहुजा फ्लोअर मिल जवळ,रामपुरी कॅम्प, अमरावती.<br>२) श्री.विजय बाबारावजी चव्हाण, वय – ५० वर्ष, व्यवसाय – ब्रोकर (शेती व प्लॉट), रा. संगीता नगर, सोनल कॉलनी जवळ, अमरावती दोन्ही खाजगी व्यक्ती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दि.२३/१०/२०२० चे १०.५३ वा. ते ११.४४ वा. दरम्यान राहुल पान कॉर्नर समोर, बँक ऑफ महाराष्ट्र चे बाजुला बियाणी चौक कॅम्प,अमरावती. |
| ४ | आमीष/प्रलोभन म्हणुन दिलेली लाच रक्कम | १०,०००/– |

यातील तक्रारदार श्री.संतोषसिंग प्रितमसिंग गिल,पद – तलाठी,नेमणुक – साझा कं.२१,वऱ्हा अतिरिक्त प्रभार साझा कं.३,सालोरा बु.ता.तिवसा जि.अमरावती यांनी दि.२०/१०/२०२० रोजी दिलेल्या लेखी तक्रारीनुसार एम.डी.एम बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे संचालक श्री.शंकर आहुजा हे त्यांचे व कुटुंबियांच्या नावाने असलेल्या मौजा सालोरा बु.येथील पडीत असलेल्या शेतजमीनी मध्ये सात बारा मधील गाव नमुना बारा मध्ये सन २०२०–२०२१ मध्ये कापुस यापिकाची नोदं करून बेकायदेशीर कृत्य करण्याकरीता १०,०००/– रूपये लाच रक्कम देण्याचे आमीष दाखवुन प्रलोभन देत आहेत व ती रक्कम त्यांना घ्यावयाची नसल्याने व कोणतेही बेकायदेशिर कृत्य करणे नसल्याने त्यांनी दिलेल्या रिपोर्ट वरून साझा कार्यालय वऱ्हा येथे दि.२२.१०.२०२० रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान यातील श्री.शंकर आहुजा यांनी तक्रारदार श्री.गील यांना पडीत शेतजमीनीमध्ये कापुस यापिकाची नोद करणेकरीता व बेकायदेशीर कृत्य करण्याकरीता १०,००० रूपये लाच स्विकारणेकरीता आमीष/प्रलोभन दिल्याचे निष्पन्न झाले व श्री.आहुजा यांचेसोबत असलेले ब्रोकर श्री.विजय चव्हाण यांनी सुध्दा तक्रारदार श्री.गिल यांना लाच स्विकारण्याकरीता आमिष/प्रलोभन देवुन श्री.आहुजा यांना सहकार्य केले.वरून आज दि.२३.१०.२०२० रोजी सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष श्री.शंकर आहुजा याने तलाठी श्री.गिल यांना १०,००० रूपये दिले वरून श्री.शंकर आहुजा व श्री.विजय चव्हाण यांना ताब्यात घेवून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.विशाल गायकवाड व अपर पोलीस अधीक्षक श्री.पंजाबराव डोगंरदिवे, घटक प्रमुख श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.राहुल वसंतराव तसरे, नापोशि श्री.विनोद कुजांम पोशि वैभव जायले,सुनिल जायभाये वाहन चालक श्री.सतिष किटुकले यांनी पार पाडली.

**नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती परिक्षेत्र,अमरावती यांनी केले आहे.**

संपर्क :– अॅन्टी करप्शन ब्युरो, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती.
टोल फ्री नंबर – १०६४ दुरध्वनी कमांक – ०७२१–२५५२३५५,२५५३०५५.

(राहुल तसरे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.

Scanned with CamScanner